# - प्रेसनोट -

## खुनी हल्ला करुन सात वर्षापासुन फरारी असणारा सराईत गुंड अटक.

---

दिंनाक – १५/१०/२०१७ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले यांचे मार्गदर्शनानुसार तपास पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग करित असताना पोलीस कर्मचारी अमोल पवार व कुंदन शिंदे यांना बातमिदारामार्फत माहीती मिळाली की , सन २०१० मध्ये बाळा चौधरी रा. अप्परइंदिरानगर पुणे याच्यावर खुनी हल्ला करणारा सात वर्षापासुनचा फरारी आरोपी दशरथ शिंदे हा हवेली हॉटेलवर कात्रज घाट येथे त्याच्या मित्राला भेटण्यासाठी येणार आहे. सदर बातमी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक साो भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे यांना कळविली असता त्यांनी योग्य ति कारवाई करण्याचे आदेश दिले.सदर ठिकाणी पोलीस स्टाफ सह रवाना झालो व बातमीच्या ठिकाणी थोडे अलीकडे जावुन थांबलो. मिळालेल्या बातमीप्रमाणे दशरथ शिंदे उभा असल्याचे दिसल्याने त्यास स्टाफच्या मदतीने ताब्यात घेतले.

आरोपीकडे दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. तेव्हा त्यास भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे गु.र.न.१६४/२०१० भा.द.वि. कलम.३०७,३२६,५०४,३४ प्रमाणे दाखल असणाऱ्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीचे विरुध्द खुन,खुनाचा प्रयत्न,दरोडा,दुखापत अशाप्रकारचे गुन्हे वेगवेगळया पोलीस स्टेशनला दाखल आहेत.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री प्रविण मुंडे , स्वारगेट विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले , पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री राजकुमार वाघचवरे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप.निरीक्षक दत्ताजीराव मोहिते,पोलीस कर्मचारी अरुण मोहिते, अमोल पवार, प्रणव संकपाळ, उज्वल मोकाशी, सर्फराज देशमुख, कुंदन शिंदे, गणेश चिंचकर, अभिजीत रत्नपारखी यांनी केलेली आहे.